महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध पुणे ४११ ०६७
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh Pune ४११०६७
E-Mail : cah.livestockandpoultry@gmail.com Telephone No.-020-25690480, 25690481, 25690485
*"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर: संपर्क टोल फ्री क्रमांक-१९६२"*

जा.क्र. : कुक्कुट -२/ प्र. क्र.२३ (भाग-२) / 4996-4203 /२०२४, पुणे-६७, पसं-१३, दि.२/०५/२०२५

**तात्काळ**

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन सहआयुक्त, (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, (सर्व)
पशुधन विकास अधिकारी, विस्तार, पंचायत समिती, (सर्व)

विषय: Online प्रणाली नुसार https.//ah.mahabms.com या संकेत स्थळावर व Google play स्टोर वरील मोबाईल अँप वरून अर्ज स्वीकारण्या बाबत

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि, नाविन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दि. ०३.०५.२०२५ ते ०२.०६.२०२५ या कालावधीत अर्ज https.//ah.mahabms.com या संकेत स्थळावर व Google play स्टोर वरील मोबाईल अँप वर स्वीकारण्यात येत आहेत.

याबाबत प्रसिद्धीसाठी बातमीचा नमुना इमेल द्वारे पाठविण्यात येत आहे. सदर बातमी नमुन्यात आपल्या जिल्ह्याचे अनुषंगाने आवश्यक बदल करून त्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी तसेच इतर माध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी देणेबाबत कार्यवाही आजच करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्त कार्यालयास तातडीने सादर करण्यात यावा. स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झालेनंतर त्याचे कात्रण हि सादर करण्यात यावे.

योजनेंतर्गत विहित कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत वेळापत्रक पाठविण्यात येत आहे. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी तसेच अर्ज स्वीकारण्याची तारीख संपल्यानंतर रँडम पद्धतीने प्राथमिक लाभार्थी निवड प्रक्रिया त्वरित पूर्ण करावयाची असल्याने त्याकरिता नियोजन करण्यात यावे.

2/5/25

(डॉ. प्रवीणकुमार देवरे भा.प्र.से)
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

प्रत- माहितीस्तव

१. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, (सर्व विभाग)
२. उपआयुक्त पशुसंवर्धन, (नियोजन व अंदाज), प्रस्तुत कार्यालय
३. समन्वयक, आय टी हब, प्रस्तुत कार्यालय

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध पुणे ४११ ०६७
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh Pune ४११०६७
E-Mail : cah.livestockandpoultry@gmail.com Telephone No.-020-25690480, 25690481, 25690485
"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर: संपर्क टोल फ्री क्रमांक-१९६२"

# -: प्रेसनोट :-

## पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकासह पशुपालक व शेतकरी बांधवाना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देत, त्यांना शाश्वत अर्थाजनाचा पर्याय उपलब्ध करून देत पशुसंवर्धन विभागाने विविध योजना व उपक्रमांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे.

विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक / शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करणेसाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली सात वर्षे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पध्दत सुरू करण्यात आली आहे. सन २०२१-२२ पासून जिल्हास्तरीय पशूसंवर्धन विषयक विविध योजनांसाठी सुद्धा सदर संगणक प्रणाली लागू करण्यात आली आहे.

यामध्ये शासनाने एखाद्या योजनेकरिता अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये यासाठी तयार केलेली प्रतिक्षायादी सन २०२१-२२ पासून पुढील ५ वर्षापर्यंत म्हणजे सन २०२५-२६पर्यंत लागू ठेवण्याची सोय केली आहे. त्यामुळे अर्ज केलेल्या पशुपालकांना लाभ मिळण्याची शक्यता वाढली असून, त्याची प्रतिक्षा यादीतील क्रमांकानुसार अंदाजे केव्हा लाभ मिळेल हे कळु शकल्यामुळे लाभार्थी हिस्सा भरणे किवा इतर बाबींकरिता नियोजन करता येणे शक्य होणार आहे.

त्यानुसार नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५ + ३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन

पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्यची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील पशुपालक/ शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक / युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ** | https://ah.mahabms.com |
| **अँड्रॉईड मोबाईल ॲप्लिकेशनचे नाव :** | AH-MAHABMS<br>(Google play Store वरील मोबाईल ॲपवर उपलब्ध) |
| **अर्ज करण्याचा कालावधी :** | **०२.०५.२०२५ ते ०१.०६.२०२५** |
| **टोल फ्री क्रमांक :** | **१९६२<br>( वेळ: सोमवार ते शनिवार<br>सकाळी ७.० ते सायंकाळी ६.० )** |
| **अधिक माहितीसाठी नजीकचा पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग (पंचायत समिती, जिल्हा परिषद), जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयात संपर्क साधावा** | |

योजनांची संपूर्ण माहिती तसेच अर्ज करण्याची पध्दती याबाबतचा संपूर्ण तपशील या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील.

या संगणकप्रणालीमध्ये अर्ज भरणे अत्यंत सुलभ करण्यात आले असून, अर्जामधील माहिती कमीत कमी टाईप करावी लागेल आणि बहुतांशी माहितीबाबत पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पशुपालकांनी अर्ज भरण्याकरिता स्वतःचे मोबाईलचा जास्तीत जास्त वापर करावा. अर्ज भरताना अर्जदाराने नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर अर्जाच्या स्थितीबाबत संदेश पाठविण्यात येणार असल्याने कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराने योजनेंतर्गत आपला मोबाईल क्रमांक बदलू नये व मागिल वर्षी अर्ज केलेल्या अर्जदारांनी पुन्हा अर्ज करावयाची आवश्यकता नाही.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी वरील तक्त्यात दर्शविलेल्या टोल फ्री क्रमांकावर किंवा तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी अथवा उपआयुक्त कार्यालय, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रावर संपर्क साधावा. असे आवाहन पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात येत आहे.

नाविन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजना लाभार्थी साठी ah.mahabms.com या प्रणालीद्वारे Online स्वरूपात अर्ज मागवणे २०२५-२६- वेळापत्रक

| दिनांक | कामाचा तपशील | एकुण दिवस/कालावधी |
|---|---|---|
| ०३ मे २०२५ ते ०२ जून २०२५ | ऑनलाईन अर्ज स्वीकारणे | ३० |
| ०३ जून २०२५ ते ०७ जून २०२५ | रॅडमायझेशन पध्दतीने लाभार्थी प्राथमिक निवड | ५ |
| ०८ - १५ जून २०२५ | मागील वर्षी तसेच या वर्षीच्या लाभार्थीमार्फत कागदपत्रे अपलोड करणे | ८ |
| १६ -२४ जून २०२५ | पशुधन विकास अधिकारी (वि), जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे मार्फत कागदपत्रे पडताळणी करुन निवड पुर्ण करणे. | ९ |
| २५-२७ जून २०२५ | लाभार्थी मार्फत कागदपत्रातील तृटी पूर्तता | ३ |
| २८-३० जून २०२५ | कागदपत्रे अंतिम पडताळणी | ३ |
| १ जुलै २०२५ | राखीव | १ |
| ०२ जुलै २०२५ | अंतिम लाभार्थी पात्रता यादी तयार | १ |
| | **एकूण** | ६० |